क्रमांक : - ७१

# महाराष्ट्र विधानसभा
## पत्रक भाग - दोन

**गुरुवार, दिनांक ८ जुलै, २०२१ / आषाढ १८, शके, १९४३**

संदर्भ :- १) या सचिवालयाचे पत्रक भाग - दोन क्र. ५१, दिनांक १२ मे, २०२१

२) या सचिवालयाचे पत्रक भाग - दोन क्र. ५७, दिनांक २४ जून, २०२१

७१. सर्व सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येते की, विधानसभा कामकाज सल्लागार समितीची मंगळवार, दिनांक २२ जून, २०२१ रोजी झालेल्या बैठकीत सन २०२१ च्या द्वितीय (पावसाळी) अधिवेशनात प्रश्नोत्तरे घेण्यात येणार नसल्याचे तसेच स्वीकृत प्रश्न व्यपगत करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. यानुषंगाने या अधिवेशनासाठी विभागाकडे उत्तरासाठी पाठविण्यात आलेले तारांकित स्वीकृत प्रश्न व वस्तुस्थितीसाठी विभागाकडे पाठविण्यात आलेले प्रश्न तसेच मा.सदस्यांना पाठविण्यात आलेले खुलाशाचे प्रश्न व्यपगत करण्यात आले होते.

तथापि, सोमवार, दिनांक ५ जुलै, २०२१ रोजी विधानसभा सभागृहात व्यपगत प्रश्न अतारांकित स्वीकृत करण्याबाबत उपस्थित केलेल्या मुद्याच्या अनुषंगाने मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिलेल्या निदेशानुसार या अधिवेशनाकरीता विभागाकडे उत्तरासाठी पाठविण्यात आलेले तारांकित स्वीकृत प्रश्न अतारांकित स्वीकृत करण्यात आले आहेत. तसेच वस्तुस्थितीचे प्रश्न / सदस्य खुलाशाचे प्रश्न विधानसभा नियमातील तरतुदींच्या अनुषंगाने व्यपगत करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

**राजेन्द्र भागवत,**
सचिव,
महाराष्ट्र विधानसभा

**विधान भवन,**
मुंबई.
दिनांक : ८ जुलै, २०२१

**याची प्रत :**

(१) महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य
(२) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष
(३) संगणक कक्ष